६ एप्रिल २०१६

॥ श्री ॥

## - मनीषापञ्चकम् -

सत्याचार्यस्य गमने कदाचिन्मुक्तिदायकम् ।
काशीक्षेत्रं प्रति सह गौर्या मार्गे तु शंकरम् ॥१॥

अन्त्यवेषधरं दृष्ट्वा गच्छ गच्छेति चाब्रवीत् ।
शंकरः सोऽपि चाण्डालस्तं पुनः प्राह शंकरम् ॥२॥

अन्नमयादन्नमयमथवा चैतन्यमेव चैतन्यात् ।
द्विजवर दूरीकर्तुं वाञ्छसि किं ब्रूहि गच्छ गच्छेति ॥३॥

किं गङ्गाम्बुनि बिम्बितेऽम्बरमणौ चाण्डालवाटीपयः
पूरे चान्तरमस्ति काञ्चनघटीमृत्कुम्भयोर्वाम्बरे ।
प्रत्यग्वस्तुनि निस्तरङ्गसहजानन्दावबोधाम्बुधौ
विप्रोऽयं श्वपचोऽयमित्यपि महान् कोऽयं विभेदभ्रमः ॥

जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु स्फुटतरा या संविदुज्जृम्भते ।
या ब्रह्मादिपिपीलिकान्ततनुषु प्रोता जगत्साक्षिणी ।
सैवाहं न च दृश्यवस्त्विति दृढप्रज्ञापि यस्यास्ति चे
च्चाण्डालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम ॥

ब्रह्मैवाहमिदं जगच्च सकलं चिन्मात्रविस्तारितं
सर्वं चैतदविद्यया त्रिगुणयाऽशेषं मया कल्पितम् ।
इत्थं यस्य दृढा मतिः सुखतरे नित्ये परे निर्मले
चाण्डालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम ॥

शश्वन्नश्वरमेव विश्वमखिलं निश्चित्य वाचा गुरोः
सत्यं ब्रह्म निरन्तरं विमृशता निर्व्याजशान्तात्मना ।
भूतं भावि च दुष्कृतं प्रदहता संविन्मये पावके
प्रारब्धाय समर्पितं स्ववपुरित्येषा मनीषा मम ॥६॥

© www.mahaveeraghuveer.com

या तिर्यङ्नरदेवताभिरहमित्यन्तः स्फुटा गृह्यते ।
यद्भासा हृदयाक्षदेहविषया भान्ति स्वतोऽचेतनाः ।
तां भास्यैः पिहितार्कमण्डलनिभां स्फूर्तिः सदा भावयन्
योगी निर्वृतमानसो हि गुरुरित्येषा मनीषा मम ॥८॥

यत्सौख्याम्बुधिलेशलेशत इमे शक्रादयो निर्वृता
यच्चित्ते नितरां प्रशान्तकलने लब्ध्वा मुनिर्निर्वृतः ।
यस्मिन्नित्यसुखाम्बुधौ गलितधीर्ब्रह्मैव न ब्रह्मविद् ।
यः कश्चित्स सुरेन्द्रवन्दितपदो नूनं मनीषा मम ॥९॥

© www.madhaveeraghuveer.com

॥श्री॥

जगद्गुरु प.पू. आद्य शंकराचार्य ज्यावेळी काशीक्षेत्री वास्तव्यास होते. त्या कालखंडात अनेक अद्भुत घटना घडल्या. आचार्यांच्या मनात अद्वैत वादाचा प्रसार हा एकच ध्यास होता. त्यासाठी सद्गुरूंच्या आदेशानुसार ते काशीक्षेत्री आले होते.

असेच एकदा आचार्य शिष्यांसहित घाटावर स्नानासाठी निघाले होते. गंगेवर जाण्यासाठी जो मार्ग होता तो अरुंद होता. पण आचार्यांच्या मुखावरील तेज पाहून लोक त्यांना आदराने रस्ता देत असत. एकदा आचार्य अरुंद बोळातून जात असताना समोरून एक उग्र चेहऱ्याचा चांडाळ हातात चार कुत्री घेऊन आला. त्यामुळे तो रस्ता पूर्ण व्यापून गेला. आचार्यांना निघून जाता येईना तेव्हा आचार्यांनी त्या चांडाळाला दूर होण्यास सांगितले. प्रथम त्या चांडाळाने लक्षच दिले नाही. नंतर मात्र आचार्यांना विचारले की कुणाला दूर होण्यास तू सांगतो आहेस — "अन्नमय अशा या देहाला की चैतन्याला? तुझे आणि माझे शरीर तर सप्तधातूंचे बनले आहे. एकच अन्न दोन्ही देहांना पोसत आहे आणि चैतन्य म्हणशील तर ते सर्वगत आहे. तेव्हा दूर व्हायचे ते कोणी व कशासाठी?"

त्याच्या प्रश्नाचा रोख आचार्यांना बरोबर समजला व हा कोणी साधा मनुष्य नसून हे प्रत्यक्ष शिवशंकर आहेत हे त्यांनी ओळखले. व त्यांना वंदन केले. इतर लोकांना व शिष्यांना मात्र यामागचे कारण उमजले नाही. इतक्या खालच्या जातीच्या अमंगळ अशा क्षुद्राला आचार्यांनी गुरु मानून वंदन का केले असावे असा प्रश्न त्यांच्या मनात आला असावा. मात्र अमंगळ अशा वेशात मंगलमय दर्शन आचार्यांना घडले. पुढे तो चांडाळ गर्दीत दिसेनासा झाला परंतु आचार्यांना त्यावेळी हे स्तोत्र स्फुरले.

©www.madhaveeraghuveer.com

मनीषा म्हणजे बुद्धिपूर्वक केलेला निश्चय! बाह्यवेष कसाही असो, तो चांडाळ असो किंवा ब्राह्मण असो, माझ्यातील उणीव, न्यूनत्व दूर करणारा मला योग्य मार्ग दाखवणारा तो माझा गुरुच आहे असा माझा बुद्धिपूर्वक केलेला निश्चय आहे. इत्येषा मनीषा मम---- हे या स्तोत्राचे ध्रुवपद आहे. पुन्हा पुन्हा आचार्य आपल्या मनावर ठसवण्यासाठी हे सांगत आहेत.

हे मनीषा पंचक आहे. त्यामुळे यातील केवळ पाच श्लोकच आचार्यांनी रचलेले असावेत. पहिले चार श्लोक या प्रसंगाची पार्श्वभूमी वर्णन करणारे आहेत. परंतु अभ्यास करताना साकल्याने या ९ श्लोकांचा विचार करावा.

मुक्तिदायक अशा काशीतील गौरीशंकराचे दर्शन घेण्यासाठी जात असताना [illegible] [illegible]

अमंगळ अशा चांडाळाला वाटेत पाहून शंकरांनी त्याला दूर हो दूर हो असे म्हटले तेव्हा प्रत्युत्तरादाखल तो चांडाळ शंकरांना पुन्हा म्हणाला.

अन्नमय देहाला अन्नमय देहापासून दूर व्हायला सांगतो आहेस की चैतन्याला चैतन्यापासून दूर व्हायला सांगत आहेस? हे ब्राह्मणश्रेष्ठा तू नक्की कुणाला बाजूला व्हायला सांगतो आहेस ते मला स्पष्ट सांग.

गंगाजलात प्रतिबिंबित होणारा सूर्य आणि मदिरेत प्रतिबिंबित होणारा सूर्य हे काय वेगवेगळे आहेत का? किंवा सोन्याच्या कलशामध्ये आणि मातीच्या कुंभामध्ये सामावलेल्या आकाशामध्ये तत्वत: फरक तरी कोणता? वृत्ति निस्तरंग झाल्यावर होणारा आनंद आणि या ब्रह्मांडात भरून राहिलेला आनंद यामध्ये अंतर असेल तर ते केवळ उपाधीचे! बाकी त्यात कोणतेही अंतर नाही.

© www.madhaveeraghuweer.com

मग असे सर्व स्पष्ट असताना हा ब्राह्मण, हा चांडाळ यात अंतर मानणारा तू भ्रमानय आहेस.

चांडाळाच्या मुखातून निघालेली ती ज्ञानपूर्ण वचने ऐकून आचार्य शंकर काहीसे स्तंभित/लज्जित झाले. त्यांनी ओळखले हा चांडाळ नाही. ही सर्व दैवी लीला आहे. लगेच त्यांनी हात जोडले व ते म्हणू लागले. जे सर्व भूतांविषयी समभाव ठेवतात आणि त्यानुसार व्यवहार करतात तेच माझे गुरु आहेत. मग त्यांचे बाह्यरूप कोणतेही असो. मी त्यांच्या चरणी प्रणाम करतो.

जी चिद्शक्ती (संविद्) जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीनही अवस्थांमध्ये स्पष्टपणे विस्तारलेली असते. जी जगत्साक्षिणी अशी शक्ती ब्रह्मापासून ते अगदी मुंगीपर्यंत सर्वांमध्ये ओतप्रोत अशी भरलेली आहे. अशी जी चित्शक्ती आहे तीच मी आहे. दृश्य वस्तु म्हणजे मी नाही अशी ज्यांची दृढ बुध्दी आहे तेच माझे गुरु आहेत. (मग ते चांडाळ असो की ब्राह्मण.) हाच माझा बुध्दिपूर्वक केलेला निश्चय आहे.

मी ब्रह्मच आहे आणि हे सर्व जगत् म्हणजे त्यातून निर्माण झालेल्या मायेचा विस्तार आहे. हे जे काही सर्व दिसत आहे तो सर्व माझ्यातील अविद्येने कल्पिलेल्या मायेचे रूप आहे. तो त्रिगुणात्मक आहे. ते ब्रह्म नित्य निर्मळ सर्वश्रेष्ठ आहे. असा ज्यांचा अत्यंत स्पष्ट विचार आहे तेच माझे गुरु आहेत.



हे संपूर्ण जगत नाशिवंत आहे हे शाश्वत सत्य आहे अशी निश्चयी गुरुंची वाणी आहे. ब्रह्म सत्य निरंतर आहे. असा विवेकपूर्ण निर्णय ज्यांनी शांत निष्कपट अंतःकरणाने घेतलेला आहे. भूतकाळातील संचित कर्म किंवा भविष्यकाळातील क्रियमाण ही (पापे) ज्या संविद् च्या अग्निमध्ये जळून भस्मसात झाली.

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

JULY · 2015

आहेत आणि ज्यांनी आपला देह प्रारब्धाच्या स्वाधीन केला आहे असे माझे गुरु आहेत.

शुद्ध भोग हे प्रारब्धाचे
शरीर वर्ती शास्त्राधारे.

पशु-पक्षी योनी असो, मनुष्य योनी किंवा देवयोनी असो – सर्वांमध्ये जी संविद स्पष्टपणे दिसून येते, हृदय, डोळे, अवयव किंवा त्यांचे विषय – वस्तुतः हे सर्व अचेतन आहेत. परंतु त्या शक्तीमुळे हे सर्व कार्यरत होतात. त्यांना चेतना मिळते. मेघमालेच्या मागे सूर्य दडलेला असला तरी त्याला प्रकाशमान करणारी ती शक्ती आहे. तिच्या स्फूर्तिमुळेच तो भासमान होतो. त्याचप्रमाणे ज्या योग्याच्या मनात चंचलता लेशमात्र ही नाही. जो स्थिर आहे, वृत्तिरहित आहे असे माझे गुरु आहेत.

शक्र (इंद्र) आदि देवतासुद्धा ज्यांच्या बुद्धिसागराचा लेश सुद्धा प्राप्त करु शकत नाहीत, योगी मुनी देखील यांच्या सहवासाने निवृत्त होतात, ज्यांचे चित्त निरंतर प्रशांतान्वित असते असे साक्षात ब्रह्मच (नुसते ब्रह्मविद नाही) असे माझे गुरु आहेत. अगदी इंद्रादि देव देखील ज्यांच्या पदांना वंदन करतात असे श्रेष्ठ आहेत तेच माझे गुरु आहेत. हाच खरोखर बुद्धिपूर्वक केलेला निश्चय आहे.

© www.madhaveeradhuveer.com